मुलाखत, उत्तरार्ध




वंदना भागवत

ख्यातनाम स्त्रीवादी साहित्यिक-समीक्षक, तसेच इंग्रजी साहित्याच्या अध्यापक

onlyvandan@gmail.com





। देवकुमार अहिरे

इतिहास विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सहाय्यक प्राध्यापक, तसेच सामाजिक चळवळींचे अभ्यासक

devkumarahire@gmail.com


# “विचार वैश्विक, कृती स्थानिक, आणि नेतृत्व वंचित स्त्रियांचं अशी स्त्री चळवळीची कार्यनीती असावी लागेल.”

## मनीषा गुप्ते





**सर्वंकष** : *भारतामध्ये स्त्रीवादाची चर्चा करत असताना लोकांना असं वाटतं की हे काहीतरी पाश्चिमात्य खूळ आहे. आपण पाश्चिमात्य स्त्रीवादासोबत आफ्रिकन स्त्रीवाद, दक्षिण आशियाई स्त्रीवाद किंवा लॅटिन अमेरिकन स्त्रीवाद या सगळ्यांशी कसं जोडून घेतलं पाहिजे?*

**मनीषा:** प्रत्येक ठिकाणची पितृसत्ता वेगळी असल्याकारणाने प्रत्येक ठिकाणचा स्त्रीवाद हा वैशिष्ट्यपूर्ण आणि वेगळा असणारच. भारतामध्ये स्थानिक पितृसत्ता आहे का? तर आहे. म्हणूनच यासोबतच स्थानिक स्त्रीवाददेखील आहे. जिथे पितृसत्ता आहे तिथे तिचा प्रतिकार करणारा संघटित अथवा असंघटित स्त्रीवाद उदयास येणार यात शंका नाही. पितृसत्तेची स्थानिक दमनकारी व्यवस्थांशी सांगड होत असल्यामुळे ती वेगळे रूपही धारण करणार, तिचे आविष्कार वैविध्यपूर्ण असणार. डॉ. बाबासाहेबांनी आणि महात्मा फुलेंनी सांगितल्याप्रमाणे आपल्या देशात जातिव्यवस्था आणि पितृसत्ता वेगळी करून पाहणे शक्य नाही. मध्य अमेरिकेत असलेल्या निकारागुवामध्ये ओगस्तो सिसार सँडिनो यांनी सुरू केलेली आणि डॅनियल ऑर्टेगा यांचे नेतृत्व असलेली, डाव्या विचारसरणीची सँडिनिस्टा पार्टी लष्करी हुकूमशाहीला आणि अमेरिकेच्या अधिपत्याला विरोध करत आलेली आहे. ऐंशीच्या दशकात कॅथॉलिक चर्चनेसुद्धा लष्करी राजवटीच्या विरोधात जाऊन, प्रतिकार करणाऱ्या जनतेच्या बाजूने ठामपणे उभे राहून, वेळ आल्यास लोकांना चर्चमध्ये लपवून मदत केली. काही ठिकाणी तर लष्कराकडून ख्रिस्ती धर्मगुरूंचा मरेपर्यंत छळ करण्यात आला होता. याचा अर्थ असा निघतो की सँडिनिस्टा आणि चर्च त्याकाळात क्रांतिकारी होते. परंतु २००५ मध्ये ऑर्टेगा यांचा पक्ष पुन्हा सत्तेत आल्यावर चर्चचे आधिपत्य मान्य करून त्यांच्या सरकारने गर्भपातविरोधी भूमिका घेतली. असे विरोधाभासदेखील बघायला मिळतात.

पाकिस्तानमध्ये स्त्रीवादी चळवळ सुरुवातीपासूनच सजग आणि प्रखर राहिली, त्याचे कारण असे की लष्करी हुकूमशाहीचे वारे तिथे आधीपासूनच घुमू लागले होते. सत्तर-ऐंशीच्या दशकात पाकिस्तानी स्त्रीवादी मैत्रिणी आम्हाला म्हणायच्या की, “तुमचा तुमच्या राज्यव्यवस्थेवर जरा जास्तच भरवसा आहे, नाही का? आमचा तर केव्हाच उडाला”. १९७२ मध्ये झिया उल हक यांची लष्करी राजवट सत्तेत आल्यावर इस्लामीकरण, लष्करीकरण आणि महिलांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणारे हुदूद कायदे हे सगळं एकत्रितपणे आणलं गेलं. **राजकारण, अर्थकारण आणि सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी ह्या सर्व घटकांमुळे पितृसत्तेचे स्वरूप बदलते, आणि मग वेगळ्या प्रकारच्या पितृसत्ता बघायला मिळतात. यांनाच आपण बहुविध पितृसत्ता (multiple patriarchies) म्हणतो. साहजिकच तिथल्या परिस्थितीनुसार स्थानिक स्त्रीवादी चळवळीचे स्वरूपही बदलत जातं.** भारतामध्ये १९९०च्या दशकात नवउदारमतवादी जागतिकीकरण अंमलात आल्यावर, आरोग्य सेवांचं आणि शिक्षणाचं मोठ्या प्रमाणात खासगीकरण झालं आणि इथल्या पितृसत्तेचा चेहरा बदलला. तसेच सध्याच्या जात-धर्माच्या अस्मितेमधून निर्माण झालेली अधिक घट्ट आणि क्रूर पितृसत्ता घरात आणि घराबाहेर बघायला मिळत असल्याकारणाने तिचा योग्य प्रतिकार

करण्यासाठी स्त्रीवादी चळवळीला सतत संघर्षाची नवी कार्यनीती आखावी लागते.

स्त्रीवाद ही पाश्चात्य संकल्पना आहे असा आरोप केला जातो. पण ह्यावर मला असं म्हणायचं आहे की आपल्या देशात स्त्रियांनी केलेली बंड नाहीयेत का? सीता, द्रौपदी पासून ते एकोणिसाव्या आणि विसाव्या शकतातील महिलांनी त्या काळातील पितृसत्तेला काव्यातून, संतवाणीतून आणि अन्य लिखाणातून (जात्यावरच्या ओव्या याची साक्ष आहेत) जाब विचारला. शेकडो महिलांनी (विशेषतः बहुजन समाजातील) तोंडी अथवा असंख्य कृत्यांतून केलेला संघर्ष तर आपल्यापर्यंत पोहोचूसुद्धा दिलेला नाहीये. आणि समजा, स्त्रीवादाची संकल्पना पाश्चात्य असेल, तर मग लोकशाही कुठून आली? समाजवाद, साम्यवाद आणि 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' हे ब्रीदवाक्य कुठून आले? बाहेरूनच ना? **थोडक्यात काय, तर इतर संस्कृतींमध्ये जे काही चांगलं आहे ते अधिक घट्ट करावं, आपल्या संस्कृतीतील समतावादी प्रवृत्ती जपून ठेवाव्या, आणि सर्व ठिकाणच्या दुष्ट आणि विषमतावादी प्रवृत्तींचा विरोध करावा.**

माझ्या दृष्टीने **स्त्रीवाद हा एखाद्या राष्ट्रापुरता सीमित असू शकत नाही.** What do women have got to gain through the concept of the nation? राष्ट्राची व्याख्या काय असते? सामूहिक संस्कृती, भाषा, परंपरा, ओळख आणि इतिहास असलेला, विशिष्ट भौगोलिक ठिकाणी राहणारा, राजकीय इच्छा आणि आपले शासन / सरकार असावं अशी आकांक्षा बाळगणारा मोठा समूह. स्वाभाविकरीत्या सामूहिक ओळखीची आणि सारखेपणाची निर्मिती वंशावळीवरून होत असते. 'वंश' पुरुषाकडूनच मानला जातो ना? राष्ट्रवाद (माझे राष्ट्र सर्वश्रेष्ठ), वंशवाद (माझाच वंश श्रेष्ठ) हे सर्व पितृसत्तेचे अविष्कार आहेत. **राष्ट्रवादाच्या संकल्पनेत 'आम्ही इतरांवर आक्रमण करू शकतो, पण त्यांनी आमच्यावर केलेला हल्ला खपवून घेणार नाही' हे अधोरेखित असल्यामुळे बलात्कारी पुरुष आमचा की बलात्कारित महिला आमची; आंतरधर्मीय लग्नात वर आमचा की वधू आमची हे वर्चस्ववाद (hegemony) घट्ट करणारे राजकारण फोफावते. बलात्कारी कधीही 'आपला' असू शकत नाही, आणि बलात्कारिता कधीही परकी असू नाही हे साधं भान या स्त्रीद्वेष्ट्या विचारसरणीमुळे हरवते.** भारत-पाकिस्तानच्या १९४७ सालच्या फाळणीमध्ये, तसेच पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान (बांगला देश)च्या फाळणीत लाखो महिलांवर बलात्कार झाले. एखाद्या समूहाची सामूहिक ओळख आणि अस्मिता नष्ट करणं ('बघा आमच्या पुरुषांचं बीज आम्ही तुमच्या गर्भाशयांमध्ये कसं घुसवलं ते – आता आरशात बघाल तेव्हा तुम्ही नक्की कोण आहात ते सांगता तरी येईल का?') ही त्यामागची विकृत आणि हिंसक विचारसरणी होती. अर्थात, मूल आईच्या वंशाचं असू शकतं याचा विसर पडलाय, आणि 'बाप कोण?' हा पितृसत्ताक प्रश्न फक्त महिलांना आणि त्यांच्या राष्ट्रांना खजील करण्यासाठी विचारला




जात आहे.

इतिहासात नोंद असलेल्या भारतीय उपखंडातील फाळण्यांच्या नंतर संबंधित राष्ट्र-राज्यांनी (nation states) 'आमच्या बायका परत द्या' म्हणून मागणी केली. अशा रीतीने, लाखो महिलांची देवाणघेवाण फाळणीच्या २-३ वर्षांनंतर झाली. उर्वशी बुटालिया, रितू मेनन आणि कमला भसीन सारख्या स्त्रीवादी लेखिकांनी याबाबत लिहायच्या आधी आपल्याला हे फारसं माहीतही नव्हतं. अनेकदा तर 'शत्रुराष्ट्राकडून झालेली मुलं तिथेच ठेवून या" असेही फर्मान काढून आईपासून मुलांना वेगळे केलं गेलं. अशा जागतिक अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर, **माझ्या देशावर असलेल्या माझ्या प्रेमाचे मोजमाप मी शत्रू राष्ट्राचा किती द्वेष करते यावरून ठरवलं जावं का? पाकिस्तानमधील स्त्रीवादी किंवा शांततावादी व्यक्ती मला माझ्या देशातील हिंसक किंवा धर्मांध व्यक्तीपेक्षा जवळची वाटली पाहिजे ना?** स्त्रीवादी चळवळीला आ आख्खं जग पितृसत्तामुक्त व्हायला हवंय, आणि ते राष्ट्रवाद इत्यादी संकुचित संकल्पनांतून शक्य होणार नाही याचं भानसुद्धा आंतरराष्ट्रीय पातळीवरील चळवळीला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीयवाद तर हवाच, पण त्यासोबत आपण कोण आहोत ह्याची नीट ओळखही हवीच. **विचार आणि विश्लेषणाच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय समज, कृतींच्या पातळीवर स्थानिक वास्तवाची जाण तसेच वंचित समूहातील महिलांच्या रोजच्या आयुष्यातील अनुभव आणि शहाणपणा ह्या घटकांवर विश्वास ठेवून, त्यांच्या नेतृत्वाने चळवळ पुढे नेली तर पितृसत्तेसोबतच इतर शोषक व्यवस्थांना टक्कर देणं शक्य होईल यात काही शंका नाही.** आजमितीला महिलासुद्धा हिंसक राष्ट्रवादाच्या, धर्माच्या आणि जातीच्या राजकारणात गुरफटत जात असताना समर्पक कार्यनीती आखणं निकडीचं ठरतं.

**सर्वंकष:** *आजच्या घडीला त्या सगळ्या चळवळींची पडझड होत चालली आहे. स्त्रीवाद त्याच्यामध्ये तग धरेल असे तुम्हाला वाटते का?*

**मनीषा:** पडझड होत चालली आहे हे खरं. १९६०-७० च्या दशकामध्ये अमेरिकेत व्हिएतनाम युद्धाच्या विरोधात आंदोलने होत होती, ब्लॅक पँथर ही संघटना कृष्णवर्णीय समूहाचे प्रश्न आक्रमकपणे उचलत होती, आपल्याकडे शेतमजुरांच्या चळवळी होत्या, दलित पँथर सक्रिय होती, ट्रेड युनियन्स शिगेला होत्या. या चळवळी इतर

चळवळींच्या पंखांना बळ देणाऱ्या होत्या. आजची आर्थिक धोरणे गरिबांच्या विरोधातील आहेत. शेतकऱ्यांच्या आणि कामगारांच्या प्रश्नाला धरून, किंवा आर्थिक समानतेबद्दल आग्रह धरणारे कार्यकर्ते रस्त्यावर उतरतात तेव्हा त्यांना अर्बन नक्षल म्हणून तुरुंगात डांबलं जातं. एका व्यक्तीला तुरुंगात खितपत ठेवलं की इतर अनेकांची ताकद त्या व्यक्तीला जेलमधून सोडवण्यामध्येच खपून जाते. तुलनेत, महिलांच्या हक्कांबद्दल आंदोलन केलं तर काही विचित्र प्रतिक्रिया नक्की येतात, पण घरामध्ये कमावणारी स्त्री किंवा शिकलेली स्त्री पितृसत्तेला चालू शकते. शासनव्यवस्थाही तिच्या विरोधात नसते. स्त्री शिकून कमवायला लागल्यापासून पुरुष थोडाफार संवेदनशील झालेला आहे. पूर्वीच्या काळात पुरुष स्त्रीसोबत चालताना तिच्या पाच-सहा पावलं पुढे चालायचा. आज आपण बघितलं तर हे अंतर कमी झालेलं दिसेल, अनेकदा ते सोबत, आपापसात गप्पा मारत चालतानाही दिसतात. 'मला या नात्यात गुंतवणूक करावीच लागणार आहे' हे पुरुषाच्यादेखील लक्षात आलं आहे.

**बाहेरची स्थिती बिघडते त्यावेळेस घराच्या आतील पितृसत्ता आणखी कठोर बनते.** हक्कांची भाषा अंगवळणी पडली नसल्याकारणाने लोक मुलींना शिकवायला पाठवताना 'शीक, पण प्रेमात पडू नको, आपल्या जाति-धर्माच्या चाकोऱ्या मोडू नको' अशी तंबी देतात. उच्च शिक्षण घेणाऱ्या अनेक मुलीदेखील 'माझ्यावर विश्वास ठेवून माझ्या घरच्यांनी मला गावावरून शिकण्यासाठी पाठवलंय. मी त्यांचा विश्वासघात करणार नाही' किंवा 'मी जर कुटुंबाविरुद्ध एखादं पाऊल उचललं तर माझ्या धाकट्या बहिणींच्या उच्च शिक्षणाच्या वाटा बंद होतील' असं म्हणतात. म्हणजे स्वातंत्र्याला मर्यादा घातल्या गेल्या आहेत. पितृसत्तेला आह्वान दिलं तर शिक्षण, बाहेर पडणं , नोकरी करणं बंद केले जाऊ शकतं याची जाणीव मुलींना आणि महिलांना पदोपदी करून दिली जाते. पण कमीतकमी शिकण्यासाठी बाहेर पडण्याचं पाऊलतरी आजच्या मुलींनी टाकलं आहे. ते वैयक्तिक उत्कर्षासाठी केलं की स्त्रीवादी दृष्टिकोनातून हे समजणं इतकं सोपं नाही, पण महिलांच्या स्वातंत्र्याचा थोड्याफार प्रमाणात विचार केला जात आहे ही समाधानाची बाब आहे.

अर्थातच पितृसत्तेच्या निर्मूलनाकडे (annihilation of patriarchy) पोहोचायला वेळ लागणार आहे. ते साध्य होण्यासाठी स्त्रीवादी चळवळ आणि इतर पुरोगामी चळवळींना आता एकत्र येण्यापलीकडे पर्याय उरलेला नाहीये.

***सर्वंकष :*** *आपण धर्म नाकारायचा की धर्मवाद नाकारायचा? समान नागरी कायदा प्रश्नाभोवतालच्या राजकारणाबद्दल तुमची काय भूमिका आहे? मुसलमान राज्य असलेल्या इराणमध्ये स्त्रिया बुरखा फेकून बाहेर येऊन त्याला आह्वान देत आहेत, परंतु अमेरिका आणि युरोपमध्ये मात्र अनेक मुस्लिम स्त्रिया बुरखा घालून आपलं आंदोलन आणि प्रदर्शन करत आहेत. इथे बुरखा फेकणं आणि बुरखा घालणं ह्या दोन्ही धर्म आणि संस्कृति ह्यांच्या संदर्भातील प्रतीकात्मक कृती आहेत. या अनुषंगाने धर्माचा आधार घेऊन निर्माण झालेल्या इस्लामिक फेमिनिझम, ख्रिश्चन फेमिनिझम, बुद्धिस्ट फेमिनिझम याकडे तुम्ही कसं पाहता?*

**मनीषा:** धर्म मानणं किंवा नाकारणं ही वैयक्तिक बाब आहे. माझ्या देशाचं संविधान 'मी नास्तिक आहे, मी कोणताही धर्म पाळत नाही' हे बोलण्याचं स्वातंत्र्य मान्य करते. त्याचप्रमाणे संविधानाने आपल्या देशामध्ये धर्म पाळण्याचं आणि नाकारण्याचं स्वातंत्र्यही मान्य केलं आहे. धर्म पाळण्याचं स्वातंत्र्य असायला पाहिजे असं मी मानते. तसेच, कर्मकांड न करता सणावाराचा आनंद आपणही घेऊ शकतो. माझं कोणत्याही धर्माशी देणंघेणं नसलं तरीही माझं हिंदूंशी, मुसलमानांशी, ख्रिश्चनांशी आणि इतर सर्व धर्म पाळणाऱ्या व्यक्तींशी स्नेहावर आधारित देणंघेणं आहे. मला आठवतं की खेड्यांमध्ये जागरण, गोंधळ, पूजा समारंभ, घरभरणी अशा कार्यक्रमांना आम्हाला प्रेमाचं आमंत्रण असायचं आणि आम्ही आवर्जून जायचो. आम्ही कधीही देवांना नमस्कार केला नाही, हळद-कुंकू, फुले वाहिली नाहीत. पण तरी ते सगळे लोक इतक्या मोठ्या मनाचे होते की आम्हाला जवळ घेऊन जेवायला बसवायचे, रमझानच्या रोज्यानंतर इफ्तारसाठी प्रेमाने बोलवायचे. कोणत्याही धर्माच्या कुटुंबाने आम्हाला 'तुम्ही धार्मिक कृती का करत नाही' असं एकदाही विचारलं नाही. आपल्या समाजामध्ये जी सहिष्णुता आहे ती जोपासणं गरजेचं आहे. इतरांशी तुम्ही चांगलं वागता तेव्हा ते समोरच्या व्यक्तीला समजतं. नातं दृढ करण्यासाठी धर्म, कर्मकांड आवश्यक नसतं.

सर्वांप्रति सहिष्णुता बाळगणं, एकमेकांशी अनुभूतीने वागणं हे जर बहुतांश लोकांना धर्माच्या माध्यमातून शक्य होत असेल तर तसं जरूर करावं. देवधर्म न मानणाऱ्या, प्रज्ञा, शील आणि करुणा ही संकल्पना मांडणाऱ्या बुद्धांची, आणि प्रेमाचे अपार महत्त्व पटवून देणाऱ्या कबीर, रुमी, खुस्रो यांची आठवण करून द्यावीशी वाटते. प्रत्येक मानवाला अन्न, आरोग्य आणि सन्मानाने जगण्यासाठीचे सर्व हक्क प्राप्त झाल्यानंतर मनुष्यजातीला आणि पृथ्वीला वाचवण्यासाठी प्रेम, करुणा, अहिंसा, क्षमा, मैत्री, सहयोग यांच्यासारख्या निरंतर, कोणत्याही विशिष्ट विचारधारेशी संबंध नसलेल्या भावना आणि कृतीच उपयुक्त असतील ना? **आपल्या राजकीय विचारांच्या विरोधात असलेली व्यक्तीही आपल्याशी चांगलं वागू शकते, आणि वैचारिक जवळीक असलेली व्यक्तीही आपल्याशी वाईट वागू शकते. म्हणून मी धर्म आणि धर्मवाद या गोष्टी वेगळ्या करण्यावर भर देते. मुस्लिम म्हणजे इस्लामी मूलतत्त्ववादी नव्हे आणि हिंदू म्हणजे हिंदुत्ववादी नव्हे हे आपल्याला स्वतःच्या गळी उतरवावे लागेल. नाहीतर धर्माचे पालन करणाऱ्या भाविकांना धर्मावादाकडे ढकलण्याचे काम आपण अनवधानाने करत राहू.**

धर्माच्या अंतर्गत, किंवा धर्माचं नाव 'reclaim' करण्यासाठी



अनेक पुरोगामी व्यक्तींनी आणि संघटनांनी काम केले आहे, करत आहेत. ‘Sisters in Islam’ ही मलेशियामध्ये स्थापन केलेली स्त्रीवादी संघटना शरिया कायद्याअंतर्गत महिलांचे हक्क मांडणं, कुराणात किंवा हदीसमध्ये महिलांवर एखादं नियंत्रण लिहिलेलं नसल्यामुळे ते शरियामध्ये आणू शकत नाही (जसे की राजा राममोहन रॉय यांनी हिंदू शास्त्रात सती जावं असे म्हटलं नसल्याचा दावा केला होता) असे युक्तिवाद केले आहेत. ‘लिबरेशन थिऑलॉजी’ (Liberation Theology) – मुक्तिदायी धर्मशास्त्र - या ख्रिस्ती धर्माच्या अंतर्गत निर्माण केलेल्या संघटनांनी मार्क्सवादी विचारांतून दक्षिण आणि मध्य अमेरिकेतील देशांमध्ये वर्गसंघर्ष केला. ‘कॅथलिक्स फॉर चॉइस’ (Catholics for choice) या आंतरराष्ट्रीय संघटनेनी चर्चच्या भूमिकेविरुद्ध जाऊन गर्भपाताला मान्यता दिली, अडलेल्या महिलांची सोडवणूक केली. सध्या ‘Hindus for Human Rights’ ही अमेरिकेतली संघटना हिंदुत्ववादाच्या आणि एकाधिकारशाहीच्या विरोधात सक्रिय आहे. ‘आम्ही या धर्माचे असूनसुद्धा आम्हाला धर्माच्या अंतर्गत असलेल्या अन्यायकारक गोष्टी पटत नाहीत’ हे सांगण्याच्या दृष्टिकोनातून केलेले वक्तव्य आणि कृती महत्त्वाच्या आहेत. धर्माचे पालन करणाऱ्यांसाठी धर्मचिकित्सा, आणि तेवढे जमत नसेल तर ‘सध्या चालेलेलं आहे ते धर्मात कुठेही लिहिलेलं नाहीये’ इतपत वाटचाल करायला ते भाविकांना उद्युक्त करतात. भारतातदेखील असे प्रयत्न सुरू आहेतच. परखडपणे धर्माची आलोचना करण्यांना फारसे अनुयायी मिळत नाहीत, किंवा चार्वाक, बुद्ध, बसवराज, चक्रधर स्वामी, कबीर, तुकाराम महाराज, फुले यांनी सुचवलेले पर्यायी मार्ग सामान्य जनतेला पचत नाहीत म्हणून रणनीतीच्या पातळीवर धर्मांतर्गत सुधारणांचा पर्याय निवडला जात असावा. मी स्वतः कोणत्याही धर्माचे पालन करत नसल्याने आणि धर्मनिरपेक्षतेची प्रवर्तक असल्याकारणाने धर्म हा केवळ वैयक्तिक पातळीवर पाळावा आणि राजकारणात किंवा समाजकारणात तो आणू नये या विचारांची आहे. कळत नकळत धर्मावर आधारित विश्लेषणात धर्म समजावून सांगणाऱ्यांचा आणि धर्मपंडितांचा (मग ते कोणत्याही धर्माचे असोत) ‘उंट आणि अरबा’च्या गोष्टीप्रमाणे शिरकाव होऊन कालांतराने त्यांचा संघटनेच्या कार्यकर्त्यांवर पगडा वाढू शकतो.




धर्माधारित राजकारण किंवा हिंसा सुरू होते तेव्हा, कोणाचे ऐकायचे हा यक्षप्रश्न सामान्यांना पडतो. विवेकी विचार मागे पडून कर्कश आवाज लोकप्रिय होतात. म्यानमारमध्ये अशीन वीराथूसारखा, तेथील लष्करी राजवटीच्या आशीर्वादाने कडवा बनलेला बौद्ध भिख्खु, आश्रित रोहिंग्यांच्या विरोधात हिंसा करण्यासाठी आम जनतेला रस्त्यावर उतरण्याचे ऐलान करतो, आणि धार्मिक गुरू मुस्लिमविरोधी कट्टर राष्ट्रवादाची संकल्पना मांडतात. श्रीलंकेत बौद्ध भिक्षु अल्पसंख्य समूहांच्या आणि धर्मांच्या (तामिळ, मुस्लिम इत्यादी) विरोधात आणि बहुसंख्यक संस्कृती आणि धर्मावर आधारित आक्रमक आणि हिंसक असा सिंहली राष्ट्रवाद मांडतात. थायलंडमध्ये ‘Military monks’ या योजनेनुसार भिक्षु असलेले पुरुष सैन्यात दाखल झाल्यावर धर्माच्या जबाबदाऱ्या निभावत असतानाही शस्त्रे बाळगू शकतात. धर्म, लष्कर आणि पितृसत्ता ह्यांच्या मिलाफाचं अचूक उदाहरण इथं बघायला मिळतं. जगाला शांतीचा विचार देणाऱ्या बौद्ध धम्माचं आधिपत्य असलेल्या देशांमध्ये जर हे घडू शकत असेल तर मग इतर धर्मांच्या बाबतीत काय बोलावं? अशा वेळेस धर्माधिष्ठित स्त्रीवादी चळवळीने काय भूमिका घ्यावी? उन्मादी राष्ट्रवाद, युद्ध अथवा यादवी युद्ध ह्यांनी तापलेल्या परिस्थितीत महिलांसकट इतर लोक आपलं ऐकणार की धर्मरक्षकांचं? देव, देश अन धर्मासाठी मरायला आणि मारायला सरसावलेल्या जनतेला सदसद्विवेकबुद्धीचं आणि स्त्रीवादाचं महत्त्व लक्षात राहणं कठीणच जाईल, नाही का?

**सर्वंकष:** *परंतु सध्या स्त्रियाच धर्माच्या आहारी जास्त जात असल्याचं दिसून येतं...*

**मनीषा:** कामाच्या निमित्ताने आपल्या संपर्कात येणाऱ्या महिला ह्या मुळात पितृसत्ता किंवा जातिव्यवस्थेशी टक्कर देण्यासाठी आपल्याकडे येत नसतात. नवरा मारतो म्हणून त्या आपल्याकडे येतात, मात्र त्या स्वतःच्या भावजयीसोबत किंवा हिंसाग्रस्त नणदेसोबत कसं वागतात हे आपल्याला कळत नसतं. आपण एखादीच्या मालकीच्या संपत्तीसाठी लढतो, परंतु ती तिच्या मुलीला संपत्तीमध्ये वाटा देईल की नाही, मुलाच्या लग्नात हुंडा घेईल का ते आपल्याला सांगता येणार नसते. दिवसा नवऱ्याच्या हिंसेमुळे कोर्टात किंवा पोलीस चौकीत खेटे घालणारी पीडित महिला संसार सुखाचा होवो यासाठी संध्याकाळी वेगवेगळ्या धर्मगुरूंच्या, बाबांच्या प्रवचनाला जाऊ शकते. दर पंधरा दिवसाला अमावस्या-पौर्णिमा असतेच, शिवाय वर्षभर वेगवेगळे सणदेखील असतात, त्यात ती रमून जाऊ शकते. धर्म-संस्कृतीच्या नावाने कामावरून आल्यावर संध्याकाळी घराबाहेर पडू शकते, कधीही जोडीने बाहेर फिरायला न गेलेलं दाम्पत्य उतारवयात तीर्थक्षेत्राला एकत्र जाऊ शकतं, नोकरी-करियर-लग्न-सासर यात अडकलेली तरुणी एकीकडे कुटुंबाच्या दडपणाखाली मूल होण्यासाठी IVF आणि जोखमीचे गरोदरपण पत्करत असते आणि दुसरीकडे वास्तुशास्त्रामुळे घरातील कलह सरतील अशी केविलवाणी आशा धरून असते. साधा प्रश्न असा




आहे की **धार्मिक कर्मकांडातून काहीतरी मिळत असल्याशिवाय एखादी महिला दिवसभर कष्ट करून आराम करायच्याऐवजी आपला मोलाचा वेळ आणि पैसा उगाच कशाला वाया घालवेल?** माता किंवा दक्ष गृहिणी असल्याबाबत सांस्कृतिक आणि धार्मिक मंचांवरून प्रत्यक्षरीत्या आणि आभासी माध्यमांतून तिचा उदोउदो केला जातो; आपण मात्र त्याची आलोचना करतो. आपल्याला सांस्कृतिक पातळ्यांवर काम करणं खूप आवश्यक आहे. आनंदी, उत्साही राहणं, स्वतःवर हसायला शिकणं, गरज असेल तेव्हा स्वतःला गंभीरपणे घेणं आणि नसेल तेव्हा न घेणंदेखील शिकलं पाहिजे.

धर्मवाद (म्हणजे इतर धर्मांच्याबद्दल घृणा शिकवणं आणि आपला धर्म श्रेष्ठ आहे असं मानणं) लोकशाहीविरोधी असतो, वैयक्तिक विचारस्वातंत्र्यावर आणि अभिव्यक्तीवर नियंत्रण आणणारा असतो. मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे संस्थापक हमीद दलवाई यांना एक प्रश्न विचारला होता की, 'इस्लाम प्रस्थापित धर्मांमध्ये सर्वात अलिकडील धर्म आहे, तर म्हणून इस्लाम हा आधुनिक धर्म आहे का?' तेव्हा हमीद दलवाईंनी असं उत्तर दिलं होतं की आपण धर्म आणि आधुनिकता यांची सांगड घालू शकत नाही. बहुतांश धर्म हे १४००-२०००-४००० वर्ष जुने आहेत, तर आधुनिकतेची मुळं गेल्या ३००-४०० वर्षांपासूनची आहेत. त्यामुळे धर्म आधुनिक असू शकत नाहीत. आधुनिकतेच्या संकल्पनांना समजून घेण्यासाठी गेल्या काही शतकांत उमगलेल्या आधुनिकतेचे निकष लावले पाहिजेत असे त्यांनी म्हटलं. **धर्म आणि धर्मवादाचं राजकारण यांच्यामधील फरक आपण लोकांना कायम सांगितला पाहिजे. हिंदू किंवा मुस्लिम असण्यामध्ये काही गैर नाही, पण हिंदुत्ववादी किंवा इस्लामिस्ट असणे ही मात्र चिंताजनक बाब आहे;** ख्रिश्चन, शीख किंवा बौद्ध असण्यात काही वावगे नाही, परंतु धर्मवादी असण्यामध्ये नक्की धोका आहे हे ठासून मांडलं पाहिजे.

**सर्वंकष:** *स्त्री चळवळीमुळे व्यक्तिगत कायदे झालेत, पण तेच कायदे आता धार्मिक विभाजनासाठी वापरले जातात किंवा कायद्याचं जमातवादीकरण होतं. या दृष्टीने स्त्रीचळवळीसमोर कुठली आह्वानं आहेत असं आपल्याला वाटतं?*

**मनीषा:** खान-पान, नाच-गाणी, उत्सव, कलाकृती, आणि ज्याच्यातून सामूहिक आनंद आणि आपुलकी निर्माण होते ती समृद्ध संस्कृतीची लक्षणं मानली पाहिजेत. चांगलं ठेवावं, बुरसटलेलं बाजूला काढावं. धर्म-संस्कृतीची रचना आणि नियम पितृसत्तेने ठरवून दिलेले असले तरी संस्कृती पाळण्याचं सर्व ओझं महिलेवर लादलं गेलं आहे. बहुतांश कुटुंबांमध्ये महिलेने आणि मुलीने कोणता पेहराव करावा अथवा करू नये यावर कठोर नियम असतात. आपल्याकडील सर्व धर्मांमध्ये कमी-जास्त अंशात हा प्रकार आढळतो. छातीचा भाग झाकेल अशाप्रकारे ओढणी घेतली पाहिजे, अंगभर पदर असला पाहिजे, मंगल कार्यक्रमाला साडीच नेसली पाहिजे, शिक्षिकांनी सलवार-कमीज घालता कामा नये; पाश्चात्य कपड्यांच्याबद्दल तर बोलायलाच नको. अशी नियंत्रणे थोड्या-बहुत प्रमाणात सर्वदूर आढळतात, त्यामुळे एखादं कुटुंब 'तू हिजाब घातल्याशिवाय घराबाहेर जाऊ शकत नाहीस', असं बंधन लादत असेल तर ते समर्थनीय नसलं तरी त्यात आश्चर्य वाटण्यासारखंही काही नाही. मात्र धर्मनिरपेक्ष असलेल्या शाळा आणि महाविद्यालयं जेव्हा हिजाब घातलेल्या मुलींना प्रवेश देत नाहीत तेव्हा धोक्याची घंटा वाजते. घरातून, गल्लीतून बाहेर पडता यावे म्हणून जिने हिजाब घातला, तिला महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर अडवून शिक्षणापासून वंचित ठेवणे हे कितपत योग्य आहे? दुसरीकडे इस्लामिस्ट लोक तिच्या हातात फलक देऊन, शिक्षण नाही मिळालं तरी चालेल परंतु बुरखा तिचा हक्क आहे असं वदवून घेतात. **दोन्ही धर्मांतील धर्मवादी (भाऊ-भाऊच!) स्त्रियांच्या हक्कांच्या विरोधात असतात, त्यांना मुलींच्या शिक्षणाशी कसलंही देणं-घेणं नसतं.**

तिहेरी तलाकचे समर्थन कोण पुरोगामी व्यक्ती करू शकेल? पण हा फौजदारी गुन्हा केव्हापासून झाला आणि तिहेरी तलाक देणाऱ्याला तीन वर्षांचा कारावास देण्यामागचं राजकारण काय, ह्या गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. धर्मातील बहुसंख्य लोकांना खुश करणं; मुस्लिम महिलेच्या हक्कांबाबत नक्राश्रू ढाळणे आणि मुस्लिम पुरुषाला शक्य तेवढ्या क्रूर रूपात दाखवणं ह्याच ह्यामागील प्रेरणा आहेत.

मुसलमान स्त्रीचे हक्क हे मुसलमान पुरुषाच्या विरोधात मांडले गेले आहेत. किंबहुना मुस्लिम पुरुषापासून मुस्लिम स्त्रीला वाचवणं गरजेचं आहे अशीच धारणा प्रचलित केली गेली आहे. थेट प्रश्न असा आहे की मुस्लिम महिलेच्या हक्कांची तुलना हिंदू पुरुषाबरोबर का केली जात नाही? ती त्याच्या बरोबरीने देशाची नागरिक नाही का?

शाहीनबागमध्ये नागरिकत्वाच्या मुद्द्याला धरून दिल्ली आणि इतर शहरांमध्ये प्रचंड थंडीच्या काळात दिवसरात्र रस्त्यावर बसलेल्या हजारो मुस्लिम महिला हातात कुराण नव्हे तर संविधान घेऊन बसल्या होत्या. त्यांची लढाई सर्व गरीब, वंचित, विस्थापित आणि सरकारी कागदपत्रे मिळू न शकणाऱ्यांच्या नागरिकत्व हक्कासाठी होती. मुस्लिम महिलेच्या शौर्याने अचंबित झालेल्या आणि पुरुषांशिवाय रस्त्यावर उतरण्याने क्षुब्ध झालेल्या बहुसंख्य पुरुषांनी मग जी कोणी मुस्लिम महिला वाढत्या साम्प्रदायिकतेबद्दल किंवा एकूणच एकाधिकारशाहीविरुद्ध बोलेल, तिचं 'बुल्ली बाई', 'सुल्ली डील्स' अशा बीभत्स पद्धतीने समूहमाध्यमांतून खच्चीकरण केलं. 'केरला स्टोरी' या फिल्मच्या माध्यमातून तर फक्त मुस्लिम पुरुषच नव्हे तर मुस्लिम मुलीसुद्धा आपल्या मुलींना फितवतात, फसवणूक करून त्यांचं लग्न लावून देतात, त्यांना सुसाईड बॉम्बर बनवतात असं दाखवण्यात आलं. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या हिंदू मुलींच्या आयांच्या ह्या चित्रपटावरील प्रतिक्रिया अशा होत्या की, आता त्यांना आता त्यांच्या मुलींना वसतिगृहात पाठवायची हिम्मत होत नाही. थोडा खोलवर विचार केला तर या सिनेमाचा थेट परिणाम सर्व धर्मांतील मुलींच्या गावाबाहेरच्या शिक्षणावर होणार होता. पुन्हा एकदा मुलींच्या उच्च



शिक्षणाविरूद्धचं षडयंत्र उघडकीस आले. **हिजाबच्या नावाखाली मुस्लिम मुलींचं शिक्षण बंद करणं, आणि मुस्लिमांच्या विरोधात प्रचार करून हिंदू मुलींचं शिक्षण बंद करणं! सर्वच धर्मांध शक्तींचा स्त्रीविरोधी अजेंडा, तात्पुरत्या काळासाठी का होईना पुढे गेला.** समाजात विष पेरायचं काम सोपं झालं.

बिकट परिस्थितीची चिकित्सा करतानाची एक खोड म्हणजे मागासलेल्या देशांसोबत आपली तुलना करत राहणं. लोकशाही जोपासणाऱ्या देशांसोबत आपण आपली तुलना का करू नये? मुलांना पश्चिमात्य देशांमध्ये, युरोपमध्ये पाठवणारे लोक आपल्या मुलांना तिथे समान हक्क असावे, भेदभाव होऊ नये याबद्दल सजग असतात, पण आपल्या देशात तसं का होत नाही याबाबत ते गप्प असतात. पाश्चात्य देशांत जर आपल्या मुलांना फ्लॅट किंवा घर नाही मिळालं तर 'बघा कसा वंशवाद आहे' असं लागलीच म्हटलं जातं. वास्तविकरीत्या तिकडे तुमच्या जात, धर्म, पंथ किंवा वंशामुळे जागा अथवा नोकरी देणार नाही असं म्हणणं कायदेशीरदृष्ट्या तरी इतकं सोपं नाही. (आता ट्रम्प यांच्या कारकिर्दीत अमेरिकेत काही दिवसांनी असं होऊही शकेल म्हणा!) मात्र आपल्या देशामध्ये असे भेदभाव सर्रास आणि उघडपणे चालतात, ते आक्षेपार्ह वाटत नाहीत. **आपल्या बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या सगळ्या लोकांच्या आडनावांची छाननी केली तर आपल्याला त्याच्यामध्ये भारताचे प्रतिबिंब आणि सर्व जातिधर्मांचं प्रतिनिधित्व दिसून येतं का?** आपल्या गल्लीतलं प्रत्येक आठवं घर मुसलमानाचं आहे का? प्रत्येक पंचविसावं घर ख्रिश्नाचं आहे का? दलित आणि बहुजन शेजार किती आहे? आपल्याच देशवासीयांना सहजपणे घर मिळत नसेल, तर मग वैश्विकतेबद्दल बोलून काय फायदा? लहानपणापासून जर 'आपण' आणि 'ते' हे घरातून शिकवलं जात असेल, तर पुढे जाऊन आपली मुलं संकुचित दृष्टिकोन घेऊनच मोठी होणार नाहीत का?

**सर्वंकष:** *हार्वर्डमध्ये एक प्राध्यापिका हिजाब घालून घेते आणि म्हणते की अमेरिकेमधील उपभोगवादाच्या अंतर्गत स्त्रियांच्या शरीराचं जे वस्तूकरण झालं आहे त्याचा निषेध म्हणून मी हिजाब घालत आहे. असे बारकावेदेखील हिजाबच्यामागे असू शकतात.*

**मनीषा:** कोणते कपडे वापरायचे हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय आहे. केव्हा काय नेसायचं, कुठे कोणते कपडे घालायचे अथवा नाही हे प्रत्येकाने स्वतःसाठी ठरवणे योग्य. जेव्हा हा निर्णय इतर कोणी घेतं, तेव्हा प्रश्न निर्माण होतात. **बाईचं अंग झाकणं आणि ते उघडं पाडणं या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.** एकीकडे तिला पुरुषांच्या लैंगिक इच्छा उद्युक्त करण्यासाठी जबाबदार ठरवलं जात असल्याने तिचे केस किंवा अंग (पुरुषांच्या) नजरेस पडू नये अशी तरतूद करणं, आणि दुसरीकडे पुरुषी नजरेला बाईचे अंग बघण्यात मजा वाटते म्हणून (त्याच्यासाठी) तिचे कपडे उतरवणं असे दोन्ही प्रकार एकाच वेळेस सुरू असतात. केवळ केसाच्या दर्शनाने किंवा बाईला बघितल्यावर जर पुरुषाच्या लैंगिक भावना चेतवल्या जात असतील तर त्याने स्वतःच्या डोळ्यांवर पट्टी बांधणे अथवा बाईकडे न पाहणे हा अधिक शहाणपणाचा पर्याय नाही का?

हार्वर्डच्या प्राध्यापिकेने महिलांच्या वस्तूकरणाचा निषेध म्हणून हिजाब का घातला याचे उत्तर तीच देऊ शकते. माझा अनुभव सांगते. २५-३० वर्षांपूर्वी दिल्लीत एका बैठकीसाठी गेले असताना एक सरकारी अधिकारी माझ्या चेहऱ्याकडे बघून बोलायच्या ऐवजी पूर्ण वेळ माझ्या छातीकडे बघून बोलत होता (अनेक महिलांना पुरुषांकडून असा अनुभव येत असतो). मग मी त्याच्या डोळ्यांकडे बघत भरल्या हॉलमध्ये माझी ओढणी काढली, थोडी झटकली, टेबलवर घडी घालून ठेवली आणि त्याच्याशी बोलणे चालू ठेवले. तो बघतोय म्हणून मी माझं शरीर का झाकावं? त्याला मी केवळ उपभोगाची वस्तू वाटत असेन, किंवा 'तू बाई असल्याकारणाने कनिष्ठ आहेस' हे दाखवायचं असेल तर माझ्या अशा खच्चीकरणाला मी स्वतः मान्यता का द्यावी? माझं शरीर मला घाणेरडं का वाटावं, आणि त्या बैठकीतील माझं योगदान किंवा सहभाग त्याच्यामुळे मी का गमवावा? तर, मी ओढणी काढल्या काढल्या तो माणूस एकदम चपापला, एक दोन वाक्यं बोलला आणि लागलीच तिथून सटकला. पुढील दीड दिवस त्याने माझ्या नजरेला नजर तर दिलीच नाही आणि माझ्या शरीराकडेही पाहिलं नाही. मी त्याच्याशी 'नॉर्मल' वागत असल्याचाच त्याला त्रास होत होता. पितृसत्तेला घाबरून आपण आपले शरीर झाकून ठेवल्याने प्रश्न सुटत नाही असं मला वाटतं.

धार्मिक आणि पितृसत्ताक चिन्हं लहानपणापासूनच आपल्यावर लादली जातात. एक मैत्रीण सांगायची की कपाळावर गंध लावलं नाही तर गुरुजी स्वतः गंधाची बाटली विकत घेऊन द्यायचे. मुलींकडे पाटी पेन्सिल, वह्या पुस्तकं, खाऊचा डबा आहे की नाही हे बघून त्यांना त्या आवश्यक वस्तू पुरवायच्या ऐवजी विद्यार्थिनीला आणि तिच्या कुटुंबीयांना खजील करणं त्यांनी स्वीकारलं होतं. दुसऱ्यां एका मैत्रिणीने शेअर केलं की टिकली लावली नाही तर वर्गाच्या बाई लाल बॉलपेन कपाळावर दाबत फिरवून त्याची लाल निशाणी तयार करायच्या. असे अनुभव आल्यावर स्वाभाविकच लाजून का होईना जाति-धर्माची चिन्हं वापरणं अंगवळणी पडतं. लहानपणापासून हिजाब किंवा डोक्यावरून पदर / ओढणी घ्यायची सवय लावली तर (कायम साडी नेसणाऱ्या महिलेला उतारवयात घरामध्ये गाऊन घालायला लाज वाटते त्याप्रमाणे) मोठेपणी ते काढणं कठीण जाणारच. कोणतंही वस्त्र किंवा चिन्ह स्वतःच्या मर्जीने वापरता येणं आणि वाटेल तेव्हा न वापरण्याचा निर्णय घेता येणं शक्य झालं पाहिजे.

WhatsApp वर नियमितपणे 'पूर्वीचे दिवस आजच्या तुलनेत कसे बरे होते, एकत्र कुटुंबे किती सुखी होती' अशा आशयाच्या पोस्ट येत असतात. Nostalgia grows bigger and better day by day. जेव्हा एखादी व्यक्ती आपला देश आणि नातेवाईक सोडून जाते तेव्हा आपल्या मातृभूमीतील परंपरा हव्याहव्याशा वाटू लागतात, पूर्वीचे फक्त चांगलेच क्षण आठवतात. आश्रित म्हणून पाश्चात्य देशांत गेलेल्या

महिलांची तर अनेक पातळ्यांवर कुचंबणा होते. नवा देश, तिथली भाषा, संस्कृती, नियम समजत नाहीत, घरातील पुरुषांना नोकऱ्यां मिळत नाहीत, जिथून पलायन केले त्या देशाच्या इतर आश्रितांच्या आणि स्वधर्मीयांच्या पलीकडे कोणाशी ओळखी नसतात, घर भाड्याने घेण्यासाठी उधारी त्यांच्याकडूनच घ्यावी लागते. साहजिकच नव्या देशात येऊन सुद्धा जग संकुचित होऊन जातं. ज्या कारणासाठी आपला देश सोडून यावं लागलं तीच बंधनं, नव्या ठिकाणी क्षणोक्षणी परक्यासारखे वाटू लागणाऱ्या घरच्याच पुरुषांकडून महिला आणि मुलींवर लादली जातात. मुली मोठया झाल्या की घरच्यांचं ऐकत नाहीत, आणि नव्या संस्कृतीचा भाग होऊ इच्छितात, तेव्हा तर कुटुंबात वादळच उठतं. मी माझ्या पीएच्. डी. च्या (पितृसत्ताक इभ्रतीच्या संकल्पनेला समजून घेत असताना) अभ्यासातून स्वीडनमध्ये घडलेला एक किस्सा वाचला, तो असा – कुर्दिस्तानमधून लहानपणीच आईवडिलांसोबत स्वीडनमध्ये येऊन तिथे वाढलेल्या तरुणीने पोलिसांकडे तक्रार नोंदवत असतांना सांगितलं की 'मी कुटुंबाच्या विरोधात जाऊन लग्न केलं आहे. आम्ही दोघं जर पुन्हा माझ्या माहेरच्या शहरात राहायला गेलो तर माझ्या जिवाला धोका आहे. माझ्या वडिलांनी धमकी दिली आहे की मी त्यांच्या शहरात गेले तर ते मला मारून टाकतील'. संरक्षणाची मागणी ऐकल्यावर पोलीस हसायला लागले. म्हणाले, 'तुझे वडील काय या शहराचे मेयर आहेत? ते तुला अशी धमकी देऊच कशी शकतात?' पोलिसांना वेगळ्या पार्श्वभूमीतून आलेल्या तरुणीच्या याचनेचे गांभीर्य तिच्या घरच्यांनी तिला जीवानिशी मारून टाकेपर्यंत समजलेच नाही.

**सर्वंकष :** *एलजीबीटीआयक्यू समुदायाच्या लोकांशी चर्चा करताना नेहमी असं जाणवतं की स्त्रीवादाशी त्यांचं एक Love-Hate पद्धतीचं नातं आहे. तुम्ही याकडे कसं बघता आणि असं नातं का तयार झालं असेल?*

**मनीषा:** लैंगिकतेवर चळवळीमध्ये खुली चर्चा होणं तर गरजेचं आहेच, परंतु एकाच प्रकारची लैंगिकता असते, आणि ती विषमलिंगीच असते या विचारसरणीतून बाहेर पडणं त्याहून अधिक गरजेचं आहे. मी पाच वर्षे दुष्काळी पट्ट्यातील खेडेगावात राहिले. तिथे उघडपणे समलैंगिक संबंधांबद्दल ऐकलं. लग्न लवकर होत असल्यामुळे आपली लैंगिकता कोणती हे समाजापुढे मांडायला अवधीच मिळत नाही, पण समलिंगी संबंध असतात असं सर्वांना माहीत असतं. समलैंगिक वा पारलिंगी असण्याचं वास्तव हे पाश्चात्य देशांकडून आलेलं नसून आपल्या संस्कृतीत पूर्वापार आहे. रामायण- महाभारतासारख्या ग्रंथांमध्येसुद्धा याचे उल्लेख आढळतात. खजुराहोमधील देवळांच्या कोरीव शिल्पांमध्ये सर्व प्रकारच्या लैंगिकता दाखवल्या आहेत. कोणाचे कोणावर प्रेम जडेल, कोणाबद्दल आकर्षण वाटेल याची खात्री कोणीही देऊ शकत नाही. ब्रिटिशांनी, विभिन्न लैंगिकतांवर नियंत्रण ठेवणारे कायदे आपल्यासकट त्यांच्या इतर वसाहतींमध्ये आणले हे बहुतांश लोकांना माहीत नाही.




स्त्रीवादी चळवळीकडून LGBTIQ+ मुद्द्यांना समर्थन मिळालेच नाही असं म्हणता येणार नाही. या १९९० च्या दशकाच्या शेवटी उभारलेल्या LGBTIQ+चळवळीचे अनेक प्रवर्तक आधीपासून स्त्रीवादी चळवळीत सक्रीय होते. स्त्रीवादी चळवळीमध्ये आपण चर्चा करू शकतो, प्रश्न विचारू शकतो, यामध्ये एकच पुस्तक नाही किंवा एकच नेता नाही. वाचनपद्धतही एक नाही. त्यामुळे वंचितत्व अनुभवलेल्या व्यक्तींच्या आणि समूहांच्या स्वाभाविकच अपेक्षा असू शकतात की या चळवळीकडून तरी आपल्याला अधिक समर्थन मिळायला हवं. स्त्रीवादी चळवळ इतर मानवी हक्कांच्या मोहिमांशी जवळीक साधू शकते, कारण त्यांच्या समवेत आपण वाढलो, एकमेकांसोबत वाद संवाद करत आपापसातील मतभेद समजून घेण्याचा प्रयत्न केला. वेश्याव्यवसायाबद्दल असेल किंवा विकलांग महिलांच्या लैंगिकतेबाबतचे प्रश्न असतील, याबद्दल आपण चर्चा करून निरंतर शिकत आहोत. त्यामुळेच लक्षात आलं की स्त्रीवादाचं सर्व साहित्य ब्रेललिपीमध्ये आणलं गेलं पाहिजे, खुणांच्या भाषेतून पितृसत्तेचं राजकारण सांगता आलं पाहिजे. विकलांग महिलेच्या लैंगिकतेबद्दल त्या चळवळीकडून समजून घेतल्याने, **LGBTIQ+ समूहांचं विवाहव्यवस्थेबद्दलचं विश्लेषण ऐकून घेतल्याने आपल्या स्वतःच्या लैंगिकतेबद्दलच्या धारणा नक्कीच समृद्ध होतात. विषमलिंगी असणं आपल्याला वाटतं तितकं 'स्वाभाविक' नसतं; लहानपणापासून लग्न (अगदी बाहुला-बाहुलीचे सुद्धा), सभोवतालची सर्व कुटुंबं, प्रेम कहाण्यांवर आधारित सिनेमे, कादंबऱ्यां , कविता, चित्र इत्यादींच्या मार्फत केल्या गेलेल्या विषमलिंगवादाच्या (heteronormativity) प्रचाराचा आपल्यावर खोलवर परिणाम झालेला आहे हे आपल्या लक्षात येते.**

वेश्याव्यवसायात असलेल्या महिलांच्या अधिकाराबद्दल काम करणाऱ्या संस्थांसोबत १९८० च्या दशकापासून मी समर्थक म्हणून जोडलेली आहे. त्यांच्यापैकी अनेकींच्या मनामध्ये स्त्रीवादी चळवळीबद्दल आशंका आहे. आवश्यक तेवढे पाठबळ किंवा आपुलकी मिळत नाही अशी तक्रार आहे. विकलांग महिलांच्या हक्कांच्या

चळवळीला सुद्धा स्त्रीवादी चळवळीबद्दल असंच वाटायचं, अजूनही वाटत असेल. जे सर्वात जवळचे समर्थक असतात त्यांच्यातील त्रुटी अधिक लख्खपणे दिसून येतात, अपेक्षाभंग लवकर होत असणार असं मला वाटतं. वेश्याव्यवसायामध्ये असलेल्या एका महिलेच्या पोटावर पोलिसाने लाथ मारली, आणि "मी गरोदर आहे, मला पोटावर तरी मारू नका' असं ती विव्हळत म्हणाली तेव्हा त्या पोलिसाने "रंडी कभी मां नही बन सकती" असं म्हणून पुन्हा एकदा एक लाथ मारली आणि त्या महिलेचा गर्भपात झाला. ह्या घटनेच्या विरोधात १५०० जणांचा मोर्चा निघाला तेव्हा त्यामध्ये वेश्याव्यवसायातले जितके लोक होते, त्यांच्या बरोबरीने स्त्रीवादी चळवळीतले कार्यकर्ते होते. सहवास वाढला की पूर्वग्रह दूर व्हायला मदत होते. एकत्रित कार्यक्रम घेत राहिल्याने, विश्लेषण करण्याच्या वेगळ्या पद्धती समजून घेतल्याने आणि पितृसत्तेला संघटित पातळीवर आह्वान दिल्याने आपलं आंदोलन बळकट होईल यात शंका नाही.

जमीर कांबळे हा LGBTIQ+ चळवळीत सक्रिय असलेला विचारवंत साथीदार प्रक्षोभक, गहन आणि त्याचवेळी सुरस असे प्रश्न विचारत असतो. माझ्यासोबतही तो याबद्दल दोन-तीनदा बोलला आहे. त्याच्या मते स्त्रीवादी चळवळीने पुरुषांना 'फसवलं'. तो म्हणतो की 'तुम्ही पुरुषत्वाला जाब विचारलात पण स्त्रीत्वाला तितक्याच परखडपणे आह्वान दिलं नाहीत'. त्याने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे. स्त्रीवादी चळवळीला पुरुषत्वाबद्दल चीड आहे, पण त्यांचं त्यांच्या सभोवतालातील/कुटुंबातील पुरुषांशी असलेलं नातं ते 'पुरुष' म्हणूनच आहे. उद्या जर हा पुरुष साडी नेसून बाहेर पडला, किंवा पुरुष असणेच त्याने नाकारले तर तुमचं आणि त्याचं नातं काय असेल? एकीकडे पुरुष हा पुरुष म्हणूनच राहिला पाहिजे असा तुमचा आग्रह, मात्र त्याच्या पुरुष असण्यावर तुम्ही नाराज! अशा आशयाचे प्रश्न त्याच्या लिखाणातून मांडत आहे. मला वाटतं की हे सर्व प्रश्न जोपर्यंत आपण चर्चाविश्वाच्या पातळीवर आणत नाही, मन मोकळं करून ऐकत नाही, नवं वाचून वाद-संवाद-सुसंवाद करत नाही तोपर्यंत आपण आतून बदलणार कसे?

**सर्वंकष:** *तुमच्या बोलण्यामध्ये वारंवार 'Lived Experience'चा मुद्दा येतोय. हा स्त्रीवादी चर्चाविश्वामध्ये खूप महत्त्वाचा मुद्दा राहिलेला आहे. वंशवादाच्या संदर्भात कृष्णवर्णीय स्त्रीवादी अभ्यासिकांनी गोऱ्या स्त्रीवाद्यांपेक्षा वैश्विक पातळीवर स्वतःचं एक वेगळं म्हणणं मांडलेलं आहे. तसं जातीच्या संदर्भात दलित-बहुजन स्त्रियांनी स्त्रीवादाच्या संदर्भात वेगळी मांडणी केलेली भारतात तुम्हाला दिसते का?*

**मनीषा:** जातीच्या संदर्भात आलोचना तर खुद्द बाबासाहेबांनीच प्रखरतेने केली आहे. मनुस्मृती हा महिला आणि जातिव्यवस्थेतील शूद्र (कष्टकरी) समूहांच्या एकत्रित शोषणाचा पाया रोवणारा ग्रंथ असल्याकारणाने बाबासाहेबांची मनुस्मृतीचे दहन करणारी क्रांतिकारी कृती आपल्या सर्वांच्या मुक्तीचा मार्ग दाखवणारी आहे. **मनुस्मृतीचं दहन केलं तो दिवस (२५ डिसेंबर) भारतीय स्त्रीमुक्ती दिन म्हणून साजरा करावा असा प्रस्ताव डॉ. प्रमिला संपत यांनी १९९० च्या दशकात मांडला. तो मान्य व्हावा यासाठी बहुजन आणि दलित स्त्रीवादी मैत्रिणी आग्रह धरत आहेत. तो मान्य झालाच पाहिजे.** आपण २५ डिसेंबर ते ८ मार्च या कालावधीत (त्यात अनेक महत्त्वाचे दिवस येतअसल्याकारणाने) विभिन्न विषयांवर कार्यक्रम घेऊ शकतो. भारतीय महिला दिनापासून ते आंतरराष्ट्रीय महिला दिनापर्यंत मारलेली मजल स्थानिक पितृसत्ता आणि वैश्विक पातळ्यांवर असलेल्या पितृसत्तांचे निर्मूलन करण्यासाठी महत्त्वाची ठरेल.

अमेरिकेमध्ये कृष्णवर्णीय स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी तिथल्या स्त्रीवादी चळवळीला जे प्रश्न विचारले ते काही अंशी भारतामध्ये सुद्धा लागू होतात. कामगारांच्या किंवा वर्गीय शोषणाच्या विरोधात सक्रिय झालेल्या चळवळींनी जरी शेतमजुरांच्या हक्कांबद्दल भूमिका घेतली असली तरीही वर्गव्यवस्थेला केंद्रबिंदू मानून, जातिव्यवस्था 'सुपर स्ट्रक्चर' मानून त्याकडे फार लक्ष दिलं नाही हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा: जरी भारतातील स्त्रीवादी चळवळ वंचित महिलांवर शासन, अभिजन, जातपंचायत अणि कुटुंब ह्यांच्याकडून होणाऱ्या हिंसेबाबत जागृत राहिली, वर्ग किंवा जातिव्यवस्थेवर आधारित प्रश्न उचलायला कचरली नाही, तरीसुद्धा तिचं नेतृत्व हे शहरी सवर्ण महिलांकडे राहिले. तिसरा मुद्दा म्हणजे भारतातील दलित हक्कांची चळवळ ही पुरुषांच्या हातामध्ये राहिली. बाहेर जातिव्यवस्थेच्या अन्यायाविरुद्धच लढणारा बहुजन पुरुष घराच्या आत फारसा बदलला नसतो. दलित महिला घराच्या आत पितृसत्तेची बळी आणि घराबाहेर जातिव्यवस्थेची बळी रहात असूनसुद्धा, तीन्ही चळवळींमध्ये दलित महिलेचे अनुभव, शहाणपण आणि नेतृत्व अग्रस्थानी नसतात. या पार्श्वभूमीवर दलित स्त्रीवाद आपल्याला नेमके प्रश्न विचारत आहे. त्याची उत्तरं आपण सर्वांनी मिळून शोधायची आहेत.

अभ्यासाच्या पारंपरिक पद्धती बदलणंही तेवढंच गरजेचं आहे. पुस्तकी भाषेत लिहिलेलं किंवा जर्नल्समध्ये छापून येणारं साहित्य अभ्यासकांच्या लक्षात राहतं. लेखकांच्या नावाची, कामाची, प्रकाशनाच्या महिन्याची आणि वर्षाची, जर्नलच्या नावाची दखल पुढील संशोधक आणि सर्वोच्च पदव्यांसाठी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संदर्भसूचीमध्ये दिली जाते. अतिशय काटेकोरपणे परीक्षक मंडळी संदर्भ सूचींचे निरीक्षण करतात. जेव्हा जेव्हा एखादा सिद्धान्त चर्चेला येतो तेव्हा त्या अभ्यासकाचं नाव आवर्जून घेतले जाते. ही उच्चभ्रू पद्धतच दलित वंचित वर्गातील व्यक्तींचे सामूहिक अनुभव वगळणारी असते. त्यांचे अनुभव माहितीचे संकलन करत असताना सामील केले जात असतात, पण ते अजरामर होतात उच्चभ्रू पद्धतीने विश्लेषण आणि लिखाण करणाऱ्यांच्या नावाखाली. संशोधन करणं आणि ते छापून आणणं महत्त्वाचं आहे. त्याचा विरोध मी करत नाही. बहुजन आणि वंचित घटकांतील महिलांचे अनुभव आणि आयुष्य यांची आपली स्वायत्तता

आहे. ती अभ्यासकांच्या पठडीतून मांडली गेल्याने त्यातील बारकावे आणि खोली हरवते, आणि त्यातून जातिव्यवस्था किंवा पितृसत्ता ह्यांना नेमका टोला देण्यासाठीच्या क्लृप्त्या आपल्या नजरेतून सुटून जातात हे मला म्हणायचं आहे.

ग्रामीण महिलांचं , दलित, भटक्या विमुक्तांचे लिखाण अजूनही महाविद्यालयीन शिक्षणात सामाजिक वास्तव समजून घेण्यासाठी का वापरलं जाऊ नये? जिवंत अनुभवांवर आधारित ही आत्मचरित्रं केवळ थिअरी समजावून सांगत नाहीत तर नवी थिअरी निर्माण करत असतात.

**बहुजन आणि दलित महिलांचे प्रश्न केवळ include करणे, किंवा इतर अनेक दृष्टिकोनांप्रमाणे (स्टँडपॉइंट्स) 'आणखी एक' असे नसून आपले स्टँडपॉइंटस तपासण्यासाठी दलितांच्या रोजच्या जीवनातील अनुभव केंद्रबिंदू ठरू शकतात. निवडणूक जिंकून आलेल्या दलित महिला सरपंचाची नग्न धिंड काढली जाते. असा प्रसंग सवर्ण महिलेच्या आयुष्यात घडू शकतो का?**

सधन, 'कुलवंत' महिलेची वस्त्रे सार्वजनिक ठिकाणी उतरवायची हिंमत गावात कोणालाही होऊ शकते का? तिचा समाजात सत्कार करून झाल्यावर तिचा नवरा तिच्या नावाने राज्य करायला मोकळा असतो. दलित महिलेचं शरीर हे गावातील उच्चभ्रू पुरुषांसाठी कायम उपलब्ध मानलं जाणं, आणि तिची लैंगिकता लांच्छनास्पद मानली जाणं हा अनुभव केवळ गरीब, वंचित आणि दलित समाजातील समूहांचा असतो. दबलेला दलित पुरुषसुद्धा याविरोधात आवाज उठवू शकत नाही. सवर्ण महिलेने घराच्या आत पितृसत्ता निमूटपणे मान्य केली तर घराबाहेर तिला तिच्या पुरुषांच्या मार्फत जातीचा आणि वर्गाचा फायदा मिळतो. जातिव्यवस्थेचे अमानवी प्रकार: अस्पृश्यता, ती बलुतेदार पुरुषाला आणि महिलेला तिच्या कुटुंबाच्या पाठिंब्यासकट जातिसूचक शिव्या देऊ शकते. शेतमजूर कामावर उशिरा आला तर "तुम्हाला कामाची काय गरज असणार? तुमच्या बायांनी तंगड्या पसरल्या की होतंय तुमचं" असे आणि याहून घाणेरडे टोमणे सहजपणे दिले जातात. स्वतःचा कामधंदा उभे करू पाहणाऱ्या बलुतेदार महिलेला बाजारबसवी म्हटलं जातं. सवर्ण महिलेच्या तोंडूनसुद्धा जेव्हा असे उद्गार येतात तेव्हा दलित महिलेबद्दल असलेली घृणा, ईर्षा आणि किल्मिष ती व्यक्त करत असते. त्याचबरोबर तिच्या स्वतःच्या कुटुंबातल्या पुरुषाच्या आक्रमक लैंगिकतेबद्दल गर्वाने बोलत असते. एकदा सवर्ण महिलेने जातिव्यवस्था पाळली की तिच्या जातीच्या अंतर्गत तिचं शोषण पितृसत्तेला सहज करता येतं. दलित महिलेला घराच्या बाहेर जातिव्यवस्थेवर आधारित भेदभावाला आणि घराच्या आत पितृसत्तेला सामोरं जावं लागतं हे वास्तव विसरता कामा नये. **सवर्ण महिलांना पितृसत्तेपासून मुक्त व्हायचं असेल तर सर्व महिलांना जातिनिर्मूलनाच्या लढ्यात उतरावं लागेल. हा लढा केवळ दलित महिलेचा नाही हे उमजणं आणि दलित स्त्रीवादाकडून नव्याने शिकणं हा आपल्या देशातील सर्वच महिलांच्या मुक्तीचा मार्ग ठरू शकेल.**



दलित-स्त्रीवादाच्या अंगाने वाचन आणि विश्लेषण आपल्याला समृद्ध करतं, आपल्यामध्ये कुठेही फूट पाडत नाही. स्त्रीवादाचे जितके सूक्ष्म प्रवाह निर्माण होतील तितकं आपल्याला सर्व शोषक व्यवस्थांना सामोरं जाण्याचं बळ प्राप्त होईल. **विविध छटांनी बहरलेला स्त्रीवाद आपल्याला मुक्तीकडे नेणारा असेल.** Let a Thousand Flowers Bloom हे तर आपल्या ब्रीदवाक्यांपैकी महत्त्वाचं ब्रीदवाक्य आहेच की.

मुस्लिम (आणि त्यातील बहुजन) महिलांचे जिवंत अनुभव, दलितांमधील विविध स्त्रियांचे वेगवेगळे अनुभव, विविध बहुजन, ख्रिस्ती (दलित आणि आदिवासी ख्रिस्ती सुद्धा), आदिवासी महिलांचे अनुभव, आणि त्यांच्या आयुष्यातील वैशिष्ट्ये यांवर ऊहापोह करण्यासाठी या सर्व गटांना वेगळं, आपल्या अपरोक्ष बसावं लागेल. आपण नाही का पुरुषांच्या अपरोक्ष बसून आपले राजकारण पाजळलं? स्त्रीवादी चळवळ उभी होत असताना आपल्यावरही रोष व्यक्त झाला होता. ही चळवळ बूर्झ्वा आहे, कष्टकरी समाजातील स्त्रीपुरुषांमध्ये यामुळे फूट पडेल, खंद्या पुरुष कार्यकर्त्याच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावले तर संघटना तुटेल इत्यादी आरोप आपल्यालाही ऐकावे लागले होते. आजचा अनुभव सांगतो की स्त्रीवादी चळवळीमुळे इतर सर्व पुरोगामी चळवळी अधिक समृध्द झाल्या, संवेदनशील बनल्या. आता आपण सुद्धा नव्याने समृध्द होऊ या.

आपल्या सगळ्यांच्या पुढे आह्वान असेल ते म्हणजे **सध्याच्या जाती आणि धर्माच्या राजकारणामध्ये केवळ अस्मिता आणि ओळखीच्या पातळीवर वंचित समूहांच्या लढाया अडकून पडू नयेत.** स्वायत्तता आणि ओळख ही लोकशाहीची मूलभूत अंगं आहेत, या लोकशाहीमध्ये असायलाच हव्यात, मात्र त्या एकल अस्मितेकडे गेल्या तर त्यातील क्रांतिकारी अंश कमी होण्याचा धोका वाढतो. म्हणूनच **स्त्रीवादी चळवळीचं इतर वंचित समूहांच्या लढ्यांशी असलेलं नातं, बांधलेली नाळ तुटता कामा नये याची आपण दक्षता घ्यायला हवी.** आपल्याला जर खऱ्या अर्थाने मजबूत स्त्रीवाद निर्माण करायचा असेल तर या गोष्टी शिकून घेऊन अनध्ययन (unlearning) करणं

गरजेचं आहे. मुस्लिम महिलांसाठी धर्मनिरपेक्ष व्यासपीठ निर्माण करणं हे आपलं काम आहे. ते निर्माण करायची संधी किंवा स्वातंत्र्य नसेल तर अल्पसंख्यांक महिलांना बहुसंख्यांकांचा धर्मवाद आणि स्वतःच्या धर्माचा धर्मवाद या दोन्हींशी लढावं लागतं. माझ्यासारख्या कार्यकर्तीला कधीकधी बहुसंख्य धर्मातील लोक रागाने फोन करतात, पण त्यांच्यासोबत चर्चा आणि संवाद साधल्यास त्यांचा राग निवळतो. आपल्याला अल्पसंख्यकांच्या धर्मवादाचा सामना करावा लागत नाही. आजच्या परिस्थितीमध्ये अल्पसंख्यक महिलांचे मुद्दे 'त्यांचे' नसून आपल्याच चळवळीचे मुद्दे आहेत. सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, समानता, समाजवाद, लोकशाही इत्यादी संविधानिक मूल्ये या गुंत्यातून सुटण्याचे मार्ग सुचवू शकतात. ही मूल्ये शब्दशः आणि भावार्थासह (in spirit and letter) अंगीकृत करणे सर्व पुरोगामी चळवळींसाठी अत्यावश्यक आहे.

**सर्वंकष:** *आपल्याकडे फुल्यांपासून संवेदनशील पुरुषांचा वारसा आहे. पण आज मात्र पुष्कळ वेळा पुरुष स्त्रीवादाला प्रतिक्रिया देत असताना त्यांची भूमिका काय असते? स्त्रीवादाला प्रतिक्रिया देताना पुरुष संवेदनशील असत नाहीत का? माझ्या मते स्त्रीवाद म्हणजे पुरुषाला प्रेम करायला शिकवण्याची प्रक्रिया आहे. अशा वेळेस संवेदनशील किंवा स्त्रीवादी पुरुष यांच्याकडे स्त्रीचळवळीने कसं बघायचं?*

**मनीषा:** पुरुषांच्या बरोबर स्त्रीवादी चळवळीचे भांडण आहे असं का म्हटलं जातं, हे मला कळत नाही. पितृसत्तेविरुद्धचा लढा हा वर्गाच्या किंवा जातीच्या पातळीवर विभक्त किंवा अलिप्त समूहांमधील संघर्ष नसतो. उदाहरण द्यायचं झालं तर जातिव्यवस्थेबद्दल बोलताना बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की जात ही अशी इमारत आहे की ज्यामध्ये तुम्ही ज्या मजल्यावर जन्माला येता त्याच मजल्यावर जगता आणि मरता. वर किंवा खाली जाण्यास जिनाच तयार केलेला नाही. इथे संघर्ष स्पष्टच आहे. मात्र, एका घरातील व्यक्ती बहुदा त्याच जातीच्या आणि वर्गाच्या असतात. त्यांचं आपापसात कोणत्या न कोणत्या पातळीवर नातं असतं. कायमच अटीतटीचा सामना नसतो. एकत्र राहायची सवय, ओढ किंवा गरज असते. विषमलिंगी असल्यास एकमेकांबद्दल आकर्षणसुद्धा असतं. जन्मतः पुरुष, महिला आणि पारलिंगी व्यक्ती एकमेकांचे शत्रू नसतात. जडणघडणीतून त्यांच्यात उतरंड निर्माण केली जाते.

आपलं भांडण भेदभाव, हिंसा आणि असमानता जोपासणाऱ्या व्यवस्थांसोबत आहे, त्यातील व्यक्तींबरोबर असेलच असे नाही. बाबासाहेब 'Annihilation of **Caste**' (जाती**व्यवस्थेचे** निर्मूलन) असं म्हणतात, फुले 'ब्राह्मण्य**वाद**' म्हणतात. यावरून आपला संघर्ष व्यवस्थांशी आहे हे स्पष्ट होतं. अर्थात, या व्यवस्थांचा ज्यांना उपजत फायदा होत असेल आणि ज्या व्यक्ती हट्टाने अथवा असंवेदनशीलतेमुळे याचा उपभोग घेणं सोडत नसतील त्यांच्याशी कधी ना कधी आपला वाद होणारच. पण दमनकारी व्यवस्था दूरवर टिकवण्यासाठी जशी शोषितांची संमती लागते (अन्तोनिओ ग्राम्शी यांच्या 'सांस्कृतिक वर्चस्ववाद' – cultural hegemony या संकल्पनेनुसार), त्याचप्रमाणे ती व्यवस्था मोडीत काढायची असेल तर शोषक वर्गातील सहयोगी व्यक्तींचं सहकार्यसुद्धा गरजेचं असतं. **पितृसत्तेने दिलेले विशेषाधिकार (मुले, बायको, जमीन जुमला, संसाधने आणि घर नावावर असणं; कुटुंबप्रमुखाचे स्थान, घरात असलेली एकाधिकारशाही, हिंसा करायची मुभा) वापरणार नाही, जन्मतः मिळालेले लाभ नाकारेन असं म्हणणारे पुरुष पितृसत्तेसाठी महिलांपेक्षा मोठे आव्हान असणार आहेत. स्त्रीवादी चळवळीत पुरुष असावेत का? तर नक्कीच असावेत पण नेतृत्व त्यांच्याकडे नसावं, ते व्यवस्थेमुळे दुष्प्रभावित झालेल्या लोकांच्या हातामध्ये असलं पाहिजे.**

पितृसत्तेच्या विरोधात पुरुष सुरुवातीपासूनच स्त्रियांबरोबर राहिलेले आहेत. एकोणिसाव्या शतकात अमेरिकेमध्ये फ्रेडरिक डग्लस हे गुलामगिरीतून मुक्ततेचा लढा आखत असताना स्त्रीवादी मूल्यांना जोपासणारे होते, महिलांच्या मतदानाच्या हक्काच्या लढ्याचे प्रवर्तक होते. भारतात राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, आगरकर, रानडे, महर्षि कर्वे, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर असे संघर्षातील खंदे सहयोगी राहिलेले आहेत. जोतीराव फुलेंइतका संवेदनशील पुरुष आजही सहसा दिसून येत नाही. खरं तर दोनशे वर्षे उलटल्यानंतर आपण फुलेंच्यापुढे जायला पाहिजे होतं, पण आज त्यांच्या पावलांवर पाऊल टाकणारे देखील पुरुष कमीच आहेत. **आज प्रत्येक आठव्या-दहाव्या घरात दुसरी बायको आहे. प्रत्येक सहाव्या-आठव्या घरात परित्यक्त्या स्त्री आहे.**

**अनेकदा दिसून येतं की पुरोगामी चळवळीतले पुरुष राजकीयदृष्ट्या प्रगल्भ असतात, पण त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात ते पारंपारिक पुरुषांपेक्षा फार वेगळे नसतात.** चळवळीतील मुलींना संघटनेअंतर्गत संवेदनशील जोडीदार मिळत नाहीयेत ही शोकांतिका आहे. आज महिला पुरुषांच्या बरोबरीने घराबाहेर कमावताना दिसत आहेत, मात्र, पुरुष अजून घराच्या आत महिलेच्या बरोबरीने काम करायला कचरत आहेत. पुरुषांमधील संवेदनशीलता जागृत झाली तर तुम्हाला पितृसत्ता मोडणं सोपं जातं. लहानपणापासून कुटुंबातील महिलांसोबत घरातील सर्व काम केल्याने मुलांच्या मनात संवेदनशीलता निर्माण होते, इतरांचा विचार करणं आणि काळजी घेणं सोपं जातं, श्रमाची किंमत आणि महत्व समजते. बालपणापासूनच मुलगा घरात काम करत असला तर लग्नानंतर 'बायकोच्या आहारी गेला' असा शिक्का घरकाम करणाऱ्या नवऱ्यावर मारला जाणार नाही. मोठे झाल्यावर 'हे माझं काम नाही' किंवा 'मी बायकोला घरात मदत करतो' असेही म्हणणारे पुरुष न बनता, 'घरकाम हे माझंही काम आहे' हे मानणारे पुरुष घडवणं आवश्यक आहे.

पितृसत्तेसोबतच पुरुषांनी (आणि महिला, पारलिंगी व्यक्तींनी

सुद्धा) इतर विषमतावादी व्यवस्थांकडून मिळणारे फायदे आणि विशेषाधिकार  नाकारणे तेवढंच आवश्यक आहे. एखादा पुरुष चळवळीत आहे परंतु तो LGBTIQ+ विरुद्ध असेल, किंवा एलजीबीटी आयक्यू चळवळीत आहे पण इस्लामोफोबिक किंवा दलितांच्या आरक्षणाच्या विरोधात असेल तर आंतरिक विरोधाभास निर्माण होतो. जातिभेद, धर्मभेद, विषमलिंगवाद हे  त्यागले तर समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेत ते आपले विश्वासार्ह मित्र नक्कीच होऊ शकतात.

**सर्वंकष:** *पितृसत्तेचा माझ्यावरही परिणाम होतोय आणि मी देखील या व्यवस्थांच्या खाली दडपला जातोय, हे ज्यावेळेस पुरुषांना कळतं, त्यावेळेस ते या व्यवस्थेच्या विरुद्ध उभे राहतात.*

**मनीषा:** अर्थातच **पितृसत्तेचे दुष्प्रभाव पुरुषांनासुद्धा भोगावे लागतात. मोकळेपणाने भावना व्यक्त न करू देणं, कायम आधारस्तंभ म्हणून कुटुंबासमोर उभं राहावं लागणं, नोकरी किंवा व्यवसाय नाकारण्याचं स्वातंत्र्य नसणं हे विपरीत परिणाम आहेतच. परंतु पुरुष हे पितृसत्तेचे स्त्रियांसमान बळी आहेत हे खरं नाही.** मी कधी कधी गंमत म्हणून असे उदाहरण देते की, एक उपाशी ब्राह्मण दलित वस्तीतून चालला आहे. आळीतले लोक त्याला घरात  येऊन जेवावे असा आग्रह करत आहेत. पण तो 'बिचारा' नाही जेवू शकत, कारण तो अस्पृश्यांसारखाच जातिव्यवस्थेचा समान बळी आहे! एक वेळेस तो दिवसभर उपाशी राहणे सहन करेल, पण आपली जात कायमची गमावणार नाही; तसेच,  दलित वस्तीच्या पलीकडे जेवण मिळेल याची शाश्वती आहे म्हणून तो इथे जेवत नाहीये हे आपल्या माहित असल्यामुळे हे विधान तकलादू आणि दांभिक आहे हे कळतं. पुरुष पितृसत्तेत हळवा होऊ शकत नाही, बायकोच्या घरी किंवा तिच्या कमाईवर जगू शकत नाही,  म्हणून तो तिच्याच इतका पितृसत्तेचा बळी आहे असं म्हणणं फोल आहे. पुरुष जेव्हा स्वतः त्यांना मिळालेले अधिकार सोडून देतील,  तेव्हा ते खऱ्या अर्थाने चळवळीचे भाग बनतील.

ज्या वेळेस आपण सामाजिक जडणघडण (social construction of gender) या भिंगातून लिंगव्यवस्थेकडे बघतो त्यावेळेस ही व्यवस्था मुलींना 'द्यायला' शिकवते आणि मुलांना 'घ्यायला' शिकवते. अशा घडवणूकीतून दिमाखदार /हिंसक पुरुषत्व आणि सोशिक/सेवाभावी  स्त्रीत्व निर्माण केलं जातं. कोवळ्या वयात मुलग्याला रात्रीच्या अंधारात बाहेर पाठवणं आणि त्याला दामटून फटकारून टोणगा करणं हे क्रूरच आहे. मात्र  त्या उलट मुलींना 'हे करू नको ते करू नको', असं म्हणून इतकं बंदिस्त करतात की ती आयुष्यभर हक्काचं असलं तरी ते मागायला कचरते. बालपणात भावाशी भांडून आपला खाऊ किंवा खेळणं घेणारी मुलगी मोठेपणी निमूटपणे माहेरच्या संपत्तीत असलेला आपला हिस्सा माहेरची वाट आईवडिलांच्या नंतर सुरू राहावी म्हणून 'चोळी बांगडीच्या' परंपरेनुसार थोडाफार पैसा घेऊन घर-शेत भावांना देऊन टाकते. संपत्तीवर हक्क सांगणारी मुलगी कृतघ्न, आगाऊ आणि स्वार्थी मानली जाते, नातेवाईकांच्यात उपहासात्मक चर्चेचा विषय बनते. अनेकदा मुलग्याकडून छळ सहन करणारे आईवडीलसुद्धा त्यालाच संपत्तीचा वारस नेमतात. या प्रक्रियेची तयारी लहानपणापासून होत असते. खेळावरून झालेल्या भांडणात मिसरूड न फुटलेला मुलगा 'ए, हे माझं घर आहे, तुला मोठं झाल्यावर तुझ्या घरी जायचं आहे' असं म्हणून, आणि पितृसत्तेचं अचूक अस्त्र वापरून बहिणीला हिणवतो.

काही पुरुष मात्र पितृसत्तेचे बळी नक्कीच होऊ शकतात, पण ते महिलांमुळे नव्हे तर पितृसत्तेच्या अंतर्गत असलेल्या वर्चस्ववादामुळे, आणि बहुतांश वेळी  इतर पुरुषांकडून. समलिंगी, पारलिंगी, विकलांग, सावत्र, संपत्तीहीन, वयस्क किंवा दुर्धर आजार असलेले पुरुष तसेच लहान मुलगे यांना पितृसत्ताक कुटुंबात दुय्यम स्थान असते, आणि ते भेदभावाचे आणि हिंसेचे बळी असू शकतात हे मान्य करावे लागेल. कारभारी पुरुष उतरंडीत सर्वात वर असल्याकारणाने तो घरातील सर्व महिलांवर आणि बहुतांश पुरुषांवर दादागिरी करू शकतो.

मग पुरुष कोणत्याही व्यवस्थेचे बळी होऊच शकत नाही का? घराच्या बाहेर आणि आत असे विश्लेषण करू या. घराबाहेर जात आणि वर्ग, शहरी-ग्रामीण, व्यवसाय, कमाई, शिक्षण, बेघर, विस्थापित, धार्मिक अल्पसंख्य, कैदी किंवा सरकारी संस्थेत असणे, शारीरिक किंवा मानसिक विकलांगता यावर आधारित कोणता पुरुष  'वरचा' आणि कोण 'खालचा' हे ठरवलं जातं.  प्रतिलोम (hypogamous) विवाह झाला तर पुरुषाला घराबाहेर आणि महिलेला माहेरच्या लोकांकडून झालेल्या हिंसेला सामोरे जावे लागते.  लहानपणापासून मुलग्याला हिंसक आणि आक्रमक बनवल्याने त्याला  घराच्या आत नक्की फायदा होतो, पण जर तो इतर बाबींमध्ये 'खालचा' ठरत असेल तर त्याचा वापर जात आणि धर्मावर आधारित अस्मितेचे  राजकारण करून घेते. बहुजन मुलांना भडकावून दंगल किंवा हल्ले होत असतांना आयत्या वेळेस त्यांच्या हातात शस्त्र देणं, मारहाण आणि खुनात पुढे करणं हे सर्रासपणे बघायला मिळतं. दंगल घडवून आणणारे 'वरचे' पुरुष त्यावेळेस घटनास्थळापासून पसार झालेले असतात. बहुजन आणि गरीब मुलग्यांवर कायदेशीर कारवाई होते, पोलीस ठाणं आणि तुरुंगाची झळ आतून अनुभवावी लागते, गुन्हा सिद्ध झाला तर पुढे नोकरीसाठी, पासपोर्ट मिळण्यासाठी त्रास होतो. **पितृसत्तेकडून घरात मिळालेल्या फायद्यांची बेरीज होईल की वजाबाकी, हे  घराबाहेर पडल्यावर जात आणि वर्गावर अवलंबून असते.**

टणक पुरुषत्व अस्मितेच्या हिंसक राजकारणासाठी कसं उपयुक्त ठरतं हे वास्तव समजून घ्यायचं असेल तर पुन्हा एकदा पितृसत्ताक कुटुंबव्यवस्थेकडे वळावं लागेल. वडिलांची एकाधिकारशाही (ते म्हणतील ती पूर्व दिशा, एखाद्या मुलीने आपल्या मनाविरुद्ध लग्न केलं तर 'ती आपल्यासाठी मेली' हा त्यांनी दिलेला फतवा सर्वांनी मान्य करणं  वगैरे), कुटुंबाच्या अंतर्गत असलेली सत्तेची उतरंड, धर्मभेद आणि जातीभेद कुटुंबाच्या पातळीवर केवळ शिकवलेच जात



नाहीत, तर या धारणांचे पुनरुत्पादन कुटुंबात केलं जातं. वर्चस्ववाद, उतरंड, हिंसा आणि भेदभाव, 'आपण' आणि 'ते' (othering) यांचं सामान्यीकरण कौटुंबिक संस्कारांच्या मांडणीतून ('आपल्यात असं नसतं!'), बालपणापासून केलं जातं. म्हणूनच आपण म्हणतो की पितृसता आणि इतर शोषणावर आधारित व्यवस्था एकमेकांना पूरक असतात. घराच्या आत आणि घराबाहेर होणाऱ्या घटनांचे फक्त खासगी (private domain) किंवा सार्वजनिक (public domain) क्षेत्र असं संपूर्ण वेगळ्या खोक्यात डांबून त्यांचे कृत्रिम वर्गीकरण करणे शक्य अथवा उचित नाही. घराच्या आत असलेली पितृसत्ता घराबाहेर असलेल्या पितृसत्तेशी हातमिळवणी करून महिलांना दोन्ही क्षेत्रात त्यांच्या हक्कांपासून कशा प्रकारे वंचित (disenfranchise) ठेवतात यावर सिल्विया वॉल्बी (Sylvia Walby) यांनी १९९० मध्ये सविस्तर मांडणी केली आहे. घराबाहेर 'त्यांच्या' महिलांवर बलात्कार करणारा 'आपला' पुरुष 'त्यांच्या' पुरुषांकडून 'आपल्या' महिलांचे संरक्षण करण्याच्या निमित्ताने घरातील किंवा गल्लीतील महिलांवर कठोर नियंत्रण ठेवतो. अर्थातच, बहुतांश हिंसेचे प्रकार घराच्या आत होत असतात, हे जगजाहीर असल्यामुळे, बाहेर लैंगिक हिंसा करणारा पुरुष स्वतःच्या घरातील महिलांवर अशीच हिंसा करत असतो हे कटू सत्य आहे. अगदी स्पष्ट बोलायचं झालं तर उदारमतवादी (liberal) पुरुष हा पितृसत्ता टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असतो, कारण या पुरुषाचं कर्तृत्व महिलांना हिंसक पुरुषांकडून वाचवणं असं असतं. घरातून बाहेर पडताना किंवा घराच्या आत सुद्धा महिलांना संरक्षणाची गरजच पडली नसती, किंवा समाजात हिंसक पुरुषच नसते तर बाकी पुरुषांनी महिलांचा कोणापासून उद्धार केला असता? पुरुषांकडून होणारी हिंसा ही पितृसतेच्या संकल्पनेत आणि रचनेतच आहे; ती केवळ 'वाईट' आणि 'चांगले' पुरुष अशा साध्यासोप्या वर्गीकरणावर नाही हे समजणे आवश्यक आहे. आपल्याला जोतीराव फुलेंसारखा क्रांतिकारी पुरुष हवा आहे, जो महिलांच्या स्वातंत्र्याबद्दल आणि पितृसत्ता आणि जातिव्यवस्थेच्या चमत्कारिक गुंतागुंतीचा ('स्त्री शूद्रातिशूद्र' या मांडणीतून) पर्दाफाश करायला कचरत नाही.

जोपर्यंत आपण पितृसत्तेला थेट जाब विचारत नाही, तोपर्यंत बाहेरच्या व्यवस्थांना टक्कर देणं शक्य होणार नाहीये, कारण आपण जोपर्यंत घरामध्ये हिंसक पुरुष तयार करू, तोपर्यंत तो बाहेरही हिंसाचार करेलच करेल. तो दंगलीमध्ये सामील होईल, बलात्कार आणि खून करेल. त्यानंतर घराच्या चार बंदिस्त भिंतींमध्ये आपल्याला त्या खुनी आणि बलात्कारी पुरुषासोबत आयुष्य काढायचं आहे हे महिलांनी विसरता कामा नये. जोपर्यंत आपण पितृसत्ता आणि इतर सर्व व्यवस्थांना, तसेच सर्व धर्मांतील धर्मवादी आणि हिंसक प्रवृत्तींना एकत्रितपणेच आह्वान देत नाही तोपर्यंत पुरुष आणि स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त होणे शक्य नाही. अर्थातच, पुरुषाला बदलण्याची मुक्तीची जबाबदारी स्त्रीवादी चळवळीने पेलावी, किंवा सवर्णांना जात सोडून देण्यास प्रवृत्त करण्याची जबाबदारी दलित चळवळीने घ्यावी हे म्हणणं योग्य नाही. ज्यांनी या व्यवस्थाच मुळात निर्माण केल्या नाहीत, जे या व्यवस्थांमुळे वंचित राहिले आहेत त्यांच्यावर का बरं आणखी एक भलीमोठी जबाबदारी लादावी? उलटपक्षी, ज्यांना या व्यवस्थांमुळे जन्मतःच विशेषाधिकार प्राप्त झाले आहेत त्यांची याबाबतच्या असमानता-विषमतांचे निर्मूलन करायची जबाबदारी असेल. म्हणूनच संवेदनशील पुरुषांनी पितृसत्तानिर्मूलनाच्या चळवळीचा भाग बनणं स्वागतार्हच आहे.

**सर्वंकष** : *पन्नास-साठ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय संस्था आता निष्क्रिय आणि निष्प्रभ होत आहेत. आपल्याला आंतरराष्ट्रीयवादीच असलं पाहिजे ह्यात शंका नाही, पण आजच्या कठीण काळात एक विचारप्रवाह म्हणून आणि एक संस्था म्हणून स्त्रीवादी आंतरराष्ट्रीयता कशी विकसित करणार? त्याला जोडून प्रश्न आहे की जगभरातील युद्धे आणि हिंसाचार ह्यांत प्रामुख्याने स्त्रिया आणि मुलं बळी जात असताना जागतिक हिंसाचाराच्या विरोधात उभं राहणं हा स्त्रीवादी चळवळीला सर्वांशी जोडणारा मुद्दा होऊ शकेल का?*

**मनीषा:** संयुक्त राष्ट्रसंघात मानवी अधिकाराचे काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्था खूप नरम आहेत. कोणत्या देशांनी (बहुदा त्यांच्या आर्थिक, लष्करी आणि राजकीय संबंधांवर आधारित) कुणाबद्दल कोणते प्रश्न उचलायचे आणि कशाबद्दल बोलायचं नाही हे आधीच ठरवलं जातं, आणि अगदी समलिंगी लोकांना लग्न करण्याचा अधिकार असावा की नाही हेदेखील नंतर त्यावरूनच ठरतं. आम्ही आठ-दहा वर्षांपूर्वी Asia Pacific Population Conference साठी बँकॉकला गेलो होतो. तिथेही असंच दिसून आलं. एलजीबीटी असणं हा अधिकार असावा का यावर भरपूर भांडण चालू होतं! रशिया आणि इराण यांच्या एकमेकांशी सारख्या गप्पा आणि चर्चा चालू होत्या. त्यांचा एलजीबीटी हक्कांना संपूर्णपणे विरोध होता. पाकिस्तानच्या उच्च पातळीवरील शिष्टमंडळाबरोबर संध्याकाळी बोलत असताना किमान पारलिंगी व्यक्तींच्या अधिकारांबद्दल तरी (हिजडे, खुसरे यांना सांस्कृतिक मान्यता असल्यामुळे) त्यांनी ठोस भूमिका घ्यावी अशी आमची चर्चा सुरू होती. सकाळी नाश्त्याच्या वेळी त्यांनी त्याबाबत सकारात्मक भूमिका घेणार असल्याचं सांगितलं. पण तेवढ्यात अमेरिकेतील त्यांच्या दूतावासाकडून इस्लामाबादवर (पाकिस्तानची राजधानी) अशी भूमिका इथे घ्यायची नाही यासाठी दबाव आणण्यात आला आणि तिथे असलेले शिष्टमंडळ (मंत्रिमंडळ पातळीवरील व्यक्ती पुरोगामी असूनसुद्धा) सकारात्मक मतदान करू शकले नाहीत. त्या उलट पॅसिफिक महासागरातील बेटं असलेले लहान-लहानसे देश, ज्यांच्यावर जागतिक तपमानवाढीमुळे भीषण परिणाम होणार आहेत, त्या सर्व १४ देशांनी एकगठ्ठा मतदान केलं आणि एलजीबीटीचे अधिकार तिथे संमत करून घेतले!

**बहुतांश आक्रमणं आणि युद्धं ही नैसर्गिक संसाधने (जर-**

**जमीन-जनाना; म्हणजेच सोने, जमीन आणि स्त्रिया) काबीज करण्यासाठी असतात आणि त्याचे सर्वात भीषण परिणाम महिला आणि मुलांवर होतात हे आपण आजसुद्धा बघत आहोत.** तरीसुद्धा इंग्लंड-आयर्लंडच्या बायका युद्धाच्या काळात हिंसाचाराच्या विरोधात एकत्र आल्या होत्या. पॅलेस्टाईन-इजरायल मध्ये सुद्धा एकमेकींना मदत करण्यासाठी बायका एकत्र आलेल्या आहेत. Pakistan-India People's Forum for Peace and Democracy (PIPFPD), South Asians For Human Rights (SAHR) किंवा 'संगत' सारख्या दक्षिण आशियाच्या पातळीवर काम करणाऱ्या संस्था / संघटना हिंसाचाराबद्दल सखोल मांडणी करत आहेत. आपण आपली जागतिक पातळीवरील मानवतावादी एकात्मता जपणं गरजेचं आहे. नवऱ्याच्या लेखी संमतीशिवाय महिला देशाबाहेर जाऊ शकत नाही अशी परिस्थिती इराणमध्ये गेल्या अनेक दशकांपासून आहे. त्या देशात महिला मृत्युदंडालाही न घाबरता सार्वजनिक ठिकाणी हिजाब आणि बुरख्यांची होळी पेटवत आहेत. सार्वजनिक ठिकाणी महिलांचा आवाज ऐकू येता कामा नये, महिला डॉक्टर आणि नर्सेस असता कामा नयेत आणि पुरुष डॉक्टरांकडे महिला जाऊ शकत नाहीत अशी प्रमाणापलीकडे भीषण परिस्थिती असून अफगाणिस्तानच्या बायका बैठकांना येतात. इतकी वाईट परिस्थिती तर आपल्याकडे अजून नाही ना? मग आपण कशाचं रडगाणं गातोय? We have to act here and now!

उजवी विचारसरणी, सांस्कृतिक आणि धार्मिक राष्ट्रवाद ही महाभयंकर संकटं आज जगासमोर येऊन ठेपली आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सूनबाई लारा ट्रम्प मध्यंतरी म्हणाल्या की, 'मला असं स्पष्ट दिसतंय की एक जागतिक उजवी चळवळ उदयास येत आहे'. जर त्यांच्या विचारांचं जागतिकीकरण होत असेल तर आपल्या विचारांचं का होऊ नये? त्यामुळे **'विचार वैश्विक, कृती स्थानिक, आता आणि इथे' ('Think global, act local, here and now') अशी आपली कार्यनीती असावी लागेल.** उरलेल्या आयुष्यामध्ये मी चांगला भारत पाहू शकेन असं मला वाटत नाहीये, पण यामुळे मला दुप्पट काम करायची ऊर्जा जोपासावी लागणार आहे. आपण जर काही केलं नाही तर इतिहासामध्ये आपल्या संघर्षाची नोंदच होणार नाही. नाझी जर्मनीमध्येसुद्धा ज्यांनी हिटलरचा विरोध केला, त्यांचा इतिहास आपल्यासाठी प्रेरणादायक ठरला आहे. आपल्याकडे अजून अफगाणिस्तान-इराण इतकी वाईट परिस्थिती आली नाहीये. जर त्या भयावह परिस्थितीतसुद्धा उद्विग्नतेतून जन्म घेणारी आणि अंगावर शहारा आणणारी आंदोलने उभी राहात असतील तर मग आपल्या देशामध्ये आपण पुरोगामी समाजपरिवर्तन घडवून आणू शकतो हा विश्वास आणि वारसा पुढच्या पिढीला का नाही देता येणार? तरुणांशी बोलताना मी हल्ली आवर्जून विचारते की **देश गरीब असताना जर शिक्षण स्वस्त किंवा फुकट होतं, सरकारी आरोग्यसेवा बळकट होत्या, तर मग आजच्या 'श्रीमंत' भारतामध्ये शिक्षण आणि आरोग्यसेवा सामान्य माणसाच्या ऐपतीपलीकडे का जाऊन बसल्या आहेत?** १९९५ नंतरच्या पिढ्यांनी फक्त आधुनिकीकरणाचे काही पैलू पाहिले आहेत (मॉल, आंतरराष्ट्रीय ब्रँड्स्च्या वस्तू इत्यादी). प्रत्यक्षात त्यांनी मुख्यत्वेकरून आधुनिकतेऐवजी मागासलेपणच पाहिलं आहे. चंगळवादी जागतिकीकरणाच्या मृगजळाला भुललो की त्याचे पडसाद महिलांच्या हक्कांच्या पायमल्लीतून उमटू लागतात. 'मी कोण, माझी संस्कृती कशी टिकवून ठेवू?' असे विचार भेडसावू लागतात. मग मुलींनी संयमाने का वागावं, कर्तव्यदक्ष गृहिणी आणि माता असणं का महत्त्वाचं, व्रतवैकल्यं, कपाळावरील कुंकू-टिळे आणि सौभाग्याची आभूषणं सकारात्मक ऊर्जा कशी निर्माण करतात यावर WhatsApp विद्यापीठावरून मिथकांचा प्रसार केला जातो. **मागील चार पिढ्यांपासून पुरुषांनी पाश्चात्य कपडे परिधान केले. त्याने आपल्या संस्कृतीला धक्का लागला नाही, तर मग मुलींनी जीन्स घातल्यावर आपली पाच-सात हजार वर्षांची संस्कृती अचानक का बरं डगमगते?**, हा प्रश्न लोकांना का पडत नाही ह्याचंच मला आश्चर्य वाटतं.

**समाजपरिवर्तनाच्या आपल्या पद्धती शोषक वर्गापेक्षा वेगळ्या असायला हव्या. त्या हिंसक असू शकत नाहीत.** पुरुषांनी हिंसा केली असली तरीसुद्धा वॉरंटशिवाय पोलिसांना त्याच्या घरात घुसवणाऱ्या असू शकत नाहीत. हिंसाचारी नवऱ्याला गावापुढे उठाबशा काढायला लावणाऱ्या असू शकत नाहीत, त्याला एक रात्र पोलिसांनी ठाण्यात नेऊन त्याचा छळ करायला लावणाऱ्या असू शकत नाहीत. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे की **कोणाचाही अती द्वेष करू नका, कारण तो तुमच्या डोक्यात कायमचे घर करून बसतो, तुम्हाला सतत प्रतिक्रियाशील करत राहतो आणि कालांतराने तुम्ही त्याच्यासारखे बनू शकता.** स्वयंभू क्रिया कोणती आणि प्रतिक्रिया कोणती हेच मग कळेनासे होते. **आपली कार्यनीती विवेकी, तात्त्विक, आदर्शवादी, अहिंसक आणि व्यावहारिक असली पाहिजे. अंधारावर उजेडानेच मात करता येते, आग विझवायला पाणीच लागतं आणि घृणा नष्ट करण्यासाठी प्रेम वाढवणं हाच पर्याय असू शकतो.** आजच्या बिकट परिस्थितीला तरुण पिढी जबाबदार नाही – ते बेरोजगारीचे, महागड्या शिक्षणव्यवस्थेचे आणि वाढत्या हिंसक अस्मितेच्या राजकारणाचे बळी आहेत. या वर्षी मला ह्या चळवळीतील ५० वर्षं पूर्ण होणार आहेत. माझ्याकडे अनुभव असला तरीही नव्या पिढीकडून शिकणे गरजेचे आहे. चौकटीबाहेर विचार करण्याचं कौशल्य तरुण पिढीकडे असतं. ते आपण त्यांच्याकडून शिकायला तयार आहोत का? आपण तरुणांशी, विशेषतः वंचितत्वाची झळ सोसत असलेल्या युवकांशी संवाद साधून एकत्रितरीत्या कार्यनीती आखली पाहिजे.

**सर्वंकष :** *धन्यवाद, ताई! ह्या बोलण्यातून तुम्ही अनेक मुद्द्यांवर खूप महत्त्वाची अंतर्दृष्टी दिली. तुमचं व्यक्तिगत जीवन, संशोधन आणि सामाजिक काम ह्यांतून तुम्ही समाजजीवनाचा घेतलेला वेध अतिशय मोलाचा आहे. चळवळीला पुढील वाटचालीसाठी आणि 'सर्वंकष'च्या वाचकांना विचार करण्यासाठी त्याचा नक्कीच उपयोग होईल. आम्हा सर्वांतर्फे मनःपूर्वक आभार!*

***

